आज़ादी का अमृत महोत्सव

भारतातील भाषिक विविधता

भारत में भाषिक विविधता

linguistic diversity in india

प्रस्तावना

मानवाच्या सामाजिक वर्तनातील महत्त्वाच्या वैशिष्ट्यांपैकी एक वैशिष्ट्य म्हणजे 'भाषा' होय. भाषा हे केवळ संवादाचे माध्यम नसून भाषेच्या मदतीने सामाजिक जडणघडण होत असते. भाषा हे अनुभव व्यक्त करण्याचे एक अत्यंत सुसंबद्ध आणि पद्धतशीर साधन आहे. प्रत्येक भाषेचे स्वत:चे असे एक वेगळेपण आहे. प्रत्येक भाषेमध्ये वेगवेगळी रचनात्मक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय वैशिष्ट्ये अंतर्भूत झालेली असतात. म्हणूनच भाषांची विविधता आपण जपली पाहिजे आणि त्यांचे महत्त्व ओळखले पाहिजे. खंडप्राय असलेल्या आपल्या भारत देशात वेगवेगळ्या भाषा वापरल्या जातात, विविध भाषांचा उपयोग संवाद साधण्यासाठी केला जातो; त्याचप्रमाणे अनेक भाषांमधून मोठ्या प्रमाणावर साहित्य निर्मिती केली जाते. थोडक्यात, आपल्या देशात समृद्ध भाषिक विविधता आहे. अर्थात, इतक्या मोठ्या प्रमाणावर भाषिक विविधता असली तरी संवाद साधण्यासाठी कोणतीही समस्या येत नाही किंवा त्यामुळे आपल्या देशाची एकता व एकात्मता भंग पावत नाही. एकूण जगाच्या साधारण २.४% टक्के भूभाग असलेल्या आणि जगाच्या लोकसंख्येच्या सुमारे ६% लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात १९,५०० पेक्षा जास्त भाषा किंवा बोलींचा वापर केला जात आहे. यापैकी १३६९ भाषा 'अधिकृत मातृभाषा' या अंतर्गत सूचीबद्ध करण्यात आल्या आहेत. आजपर्यंत, भारतीय राजघटनेनुसार २२ प्रमुख भाषांना मान्यता देण्यात आली आहे. या २२ भाषांचा समावेश राजघटनेच्या ज्या सूचीमध्ये करण्यात आला आहे त्याला 'अनुसूची क्रमांक ८' असे म्हटले जाते. या सूचीमध्ये समाविष्ट केलेल्या २२ भाषा या आपल्या देशातील प्रमुख भाषा असून सुमारे ९६.७% टक्के लोक या भाषांचा वापर 'मातृभाषा' म्हणून करतात. तसेच, या भाषांमधून विपुल साहित्यनिर्मिती करण्यात आली आहे. आपल्या देशातील भाषिक परंपरा प्राचीन असून ही परंपरा इसवी सन पूर्व ५०० पासून असल्याचे आढळून आले आहे. आपल्या देशातील भाषेच्या या अतिप्राचीन परंपरांची साक्ष आजही अनेक अभिलेखांतून पाहायला मिळते.

'भारत देशातील भाषिक विविधता' या प्रदर्शनाच्या माध्यमातून आपल्या देशात प्रचलित असलेल्या सांस्कृतिक विविधतेचेसुद्धा दर्शन घडते.

डमरू

हिंदू धर्मामध्ये देव-देवतांशी संबंधित अनेक दंतकथा आहेत. या देवतांमध्ये ब्रह्मा, विष्णू आणि महेश या त्रिमूर्तींचाही समावेश आहे. यापैकी महेश किंवा भगवान शंकर हे वेगवेगळ्या प्राचीन आशिवार्द कलांचे प्रतिनिधित्व करतात, असे मानले जाते. त्यामुळे भगवान शंकराकडे त्रिशूल, डमरू, चंद्रकोर, पवित्र गंगा असल्याचे दिसते आणि या सगळ्यांचा वापर वेगवेगळ्या कलाप्रकारांत केलेला आढळतो. विश्वातला पहिला ध्वनी किंवा नाद हा भगवान शंकराच्या डमरूमधून निर्माण झाल्याची एक अख्यायिका आहे. याच ध्वनीमुळे शब्द तयार झाला आणि अशा अनेक शब्दांपासून प्रारंभिक भाषा विकसित झाली, असे मानले जाते. भगवान शंकर हे नटराजाच्या रुपात डमरूच्या तालावर नृत्य करत असल्याच्या कांस्यमूर्ती चोला साम्राज्याच्या काळापासून आढळतात. हिंदू पौराणिक कथांनुसार या नृत्यामुळे विश्वाची निर्मिती झाली. त्या अर्थाने, डमरू हे भाषेच्या उत्क्रांतीचे प्रतिक आहे.

पतंजली

पतंजली

पतंजली या प्राचीन भारतीय ऋषींनी योगशास्त्रावर आधारित 'योगसूत्रे' आणि संस्कृत व्याकरण स्पष्ट करणाऱ्या 'महाभाष्य' या ग्रंथाची निर्मिती केली. त्यांनी 'पतंजलतंत्र' नावाचा वैद्यकीय ग्रंथही लिहिला.

पतंजली यांनी ध्वनीच्या निर्मितीबद्दलसुद्धा विवेचन केले आहे.पतंजली यांनी ध्वनीला 'स्फोट' असे संबोधले आहे. त्यांच्या मते, ध्वनी किंवा आवाज हा एखाद्या भाषणाचा अविभाज्य असा भाग असतो. नकोसा वाटणारा किंवा अर्थहीन ध्वनी कितीही लांबीचा असू शकतो; मात्र अर्थपूर्ण ध्वनी हा विशिष्ट असतो. पतंजली यांनी मांडलेली ही संकल्पना 'फोनेम' म्हणजेच ध्वनीखंडाच्या उच्चाराच्या आधुनिक कल्पनेशी जोडली गेली आहे.

language which inspired our moto

बोधवाक्य

१९५६ साली संस्कृत आयोगाने सादर केलेल्या अहवालात संस्कृत भाषेचे सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन विविध सरकारी विभागांना बोधवाक्य म्हणून संस्कृत भाषेचा वापर करण्याची शिफारस केली. त्यावेळेस भारताच्या एकात्मतेला धोका निर्माण करणाऱ्या विद्वेषी प्रवृत्ती आणि भाषिक विचित्रतेच्या वाढीस प्रतिबंध करणे हा त्यामागचा उद्देश होता.

UNIVERSITY OF DELHI निष्ठा धृति: सत्यम् Truth is borne by faith	SUPREME COURT OF INDIA यतो धर्मस्ततो जयः Whence dharma, thence victory	INDIA METEOROLOGICAL DEPARTMENT आदित्यात् जायते वृष्टिः The Sun Gives Rainfall
REPUBLIC OF INDIA सत्यमेव जयते Truth alone triumphs	INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY KANPUR भगन चित्त न किमपि साध्यम् Without effort nothing is possible	BANGALORE UNIVERSITY ज्ञानविज्ञान महीयसे Realized knowledge
INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT AHMEDABAD योग: कर्मसु कौशलम् To do one's work skillfully is Yoga	INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT BANGALORE विद्या विनियोगात् विकासः Progress comes from proper application of Knowledge	ALL INDIA RADIO बहुजनहिताय बहुजनसुखाय For the benefit of all, for the comfort of all
DOORDARSHAN सत्यं शिवम् सुन्दरम् Truth is God and God is beautiful	CENTRAL BOARD OF SECONDARY EDUCATION असतो मा सद्गमय From Untruth to Truth	ALL INDIA INSTITUTE OF MEDICAL SCIENCES शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् Body alone is the instrument of doing all duties/deeds. Kumarasambhavam
SANSKRIT HINDU UNIVERSITY विद्ययामृतमश्नुते Be immortal through knowledge	ANDHRA UNIVERSITY तेजस्वि नावधीतमस्तु May our knowledge become brilliant	

भाषेची विविधता –
एका हिंदी उक्तीनुसार :

"कोस कोस पर पानी बदले चार कोस पर वाणी"

भाषा ही संस्कृती आणि सामाजिक जीवनाची दूत म्हणून कार्य करते. आपल्या देशात अनेक शतकांपासून भाषिक विविधतेची समृद्ध परंपरा आढळते. मात्र प्रमुख भाषांच्या स्वतःच्या लिपी आणि साहित्यामध्ये मोठ्या प्रमाणावर त्यांचा झालेला वापर यामुळे दुर्दैवाने इतर काही भाषांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. हजारो भाषांचे अस्तित्व जोपासणाऱ्या भारतात अनेक शतकांपूर्वी वापरात असलेल्या प्राचीन बोलीभाषांचे अस्तित्व झपाट्याने नाहीसे होत चालले आहे. बोलीभाषांचे खरे महत्त्व हे त्या भाषांमध्ये असणाऱ्या विविध घटकांच्या संकल्पनेत असते. त्यामुळे वास्तवात भाषेचा क्षय होत नाही, तर काळाच्या ओघात त्या भाषेत असणाऱ्या वेगवेगळ्या संकल्पना मोडीत निघतात आणि मग ती भाषा वापरणे हळूहळू कमी होत जाते.

आपल्या राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीमध्ये बहुभाषिक भारतीय प्रांतांची वेगवेगळ्या राज्यांमध्ये भाषेच्या आधारावर पुनर्रचना केली आहे. परिणामी, हजारो बोलीभाषा आणि किरकोळ भाषांना दुर्दैवाने राज्यांमध्ये मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे या सगळ्या भाषांना मुख्य प्रवाहात परत आणण्यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत. भारतातली समृद्ध भाषिक विविधता आणि ज्या बोलीभाषा आपल्या देशात वापरल्या जातात त्यावरून भारतीय भाषा सर्वेक्षण विभागाने एक मनोरंजक निरीक्षण नोंदवले आहे. एका सर्वेक्षणात त्यांना बर्फवृष्टीचे वर्णन करणारे तब्बल २०० शब्द केवळ हिमालयीन प्रदेशात वापरल्या जाणाऱ्या विविध भाषांमध्ये सापडले आहेत. याशिवाय मुंबईजवळच्या काही गावांमध्ये पोर्तुगीज भाषेचे जुने रूप, गुजरातच्या काही भागांमध्ये बोलल्या जाणाऱ्या जपानी भाषेचे स्वरूप आणि अंदमान बेटांमध्ये लोकप्रिय असलेली म्यानमारमधील एक भाषा अशा काही आश्चर्यकारक निरीक्षणांची नोंद परकीय भाषांच्या संदर्भात भारतीय भाषा सर्वेक्षण विभागाने केली आहे.

थोडक्यात, हिंदीमध्ये वापरल्या जाणाऱ्या "कोस कोस पर पानी बदले, चार कोस पर वाणी" या उक्तीप्रमाणे मैलोगणिक भाषा बदलत जाते आणि हीच भाषिक विविधता आहे.



रेडिओ: जनसमुदाय आणि भाषा यांना जोडणारे प्रभावी माध्यम

१९३६ मध्ये 'ऑल इंडिया रेडिओ' (एआयआर) ची स्थापना झाली. १९५७ पासून त्याचे अधिकृत नामकरण 'आकाशवाणी' (म्हणजेच 'आकाशातून येणारा आवाज') असे करण्यात आले. आकाशवाणीने २३ भाषांमधून आणि १७९ बोलीभाषांमधून कार्यक्रमांची निर्मिती आणि प्रसारण केले आहे. आपल्या देशात मोठ्या प्रमाणावर असलेल्या सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण लोकसंख्येसाठी आकाशवाणीचे हे कार्य महत्त्वपूर्ण आहे. आजही आकाशवाणी हे जनसंवादाचे प्रभावी माध्यम आहे. आजही आकाशवाणीवरून २३ भाषा आणि १४६ बोलीभाषांमधून कार्यक्रम प्रसारित केले जातात. त्यासाठी ११६ प्रादेशिक वाहिन्या देशातल्या २९ राज्ये आणि ६ केंद्रशासित प्रदेशांमधून कार्यरत आहेत. यामध्ये शिर्लागमधील ईशान्य भारत सेवेचा समावेश आहे, ज्याच्या माध्यमातून आपल्या देशाच्या ईशान्य भागातील वैतन्यशील सांस्कृतिक वारसा सादर केला जातो.

आकाशवाणीच्या बाह्य सेवा विभागातर्फे ११ भारतीय आणि १६ परदेशी भाषांमध्ये कार्यक्रम प्रसारित केले जातात. हे कार्यक्रम १०० हून अधिक देशांमध्ये प्रसारित होतात. परदेशातील लोकांना आपल्या देशातील घडामोडींबद्दल माहिती देणे आणि त्यांचे मनोरंजन करणे ही या प्रसारणाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. आपल्यापैकी प्रत्येकानेच सकाळी लवकर 'आकाशवाणी' चे प्रसारण सुरु होताना लावली जाणारी सांकेतिक धून ऐकली असेल.

या प्रदर्शनामध्ये, भारतातल्या विविध २२ भाषांमधून सादर करण्यात आलेले एकच गाणे उपलब्ध करण्यात आले आहे. सोबतच्या रेडिओ प्रतिकृतीवर असलेला नॉब बदलून वेगवेगळ्या भाषेतले हे गाणे तुम्हाला ऐकता येईल.

संस्कृत

प्राचीन काळापासून वापरात असलेली भारतीय भाषा



संस्कृत ही पुरातन काळापासून वापरात असलेली अतिप्राचीन भारतीय भाषा आहे.इतर भारतीय भाषांमधील शब्दसंग्रहावर आणि या भाषांच्या व्याकरणावर संस्कृत भाषेचा प्रभाव असल्याचे आपल्याला पहायला मिळते. संस्कृत भाषा आणिया भाषेचे काही अंश अनेक भारतीय भाषांमध्ये; तसेच ग्रीक, फ्रेंच, इंग्रजी, अरबी, फारसी, माया इत्यादी प्राचीन आंतरराष्ट्रीय भाषांमध्ये आढळतात. हिंदी, तामिळ, तेलुगु, कन्नड, मल्याळम, मराठी, बंगाली, उडिया अशा बहुतेक भारतीय भाषांमध्ये संस्कृत व्युत्पन्न किंवा संस्कृत शब्द असल्याचे आढळते. यावरून प्राचीन भारतात संस्कृत ही प्रमुख भाषा असल्याचे सिध्द होते.संस्कृत ही अशी भाषा आहे ज्यामधून ऋग्वेद आणि इतर वैदिक साहित्यासारखे प्राचीन भारतीय ग्रंथ रचले गेले होते. प्राचीन काळात अनेक शतके संस्कृत ही बोलीभाषा म्हणून भारतात प्रचलित होती.भारतामध्ये प्राचीन काळापासून संस्कृत ही एक महत्त्वाची भाषा म्हणून मानली जात होती.भारतात परदेशी भाषांचा वापर वाढला आणि संस्कृत भाषेची घसरण सुरू झाली, जी जवळजवळ ९००वर्षे चालू राहिली. संस्कृत भाषा, तिचे व्याकरण, वाक्यरचना इत्यादींचे परिष्करण अत्यंत विकसित होते आणि अनेक पाश्चात्य विद्वानांनी जगातील इतर कोणत्याही समकालीन भाषांपेक्षा संस्कृत भाषा अधिक विकसित असल्याचे म्हटले आहे.

देवनागरी लिपी आणि भारतीय भाषा

संस्कृत आणि इतर काही भारतीय भाषांमध्ये लिहिण्यासाठी वापरण्यात येणारी आणि प्राचीन भारताविकसित झालेली देवनागरी लिपी ही अद्याप ज्ञात असलेल्या सिंधू लिपी व्यतिरिक्त सर्वात जुनी लेखन प्रणाली आहे, असे मानले जाते. दुर्दैवाने, या लिपीचे नेमके मूळ किंवा सुरुवात भारतात नेमकी कधी झाली याची निश्चिती केली गेली नाही. मात्र, तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की देवनागरी लिपी ही ब्राह्मी लिपीपासून उदयाला आली. सुमारे इसवी सन पूर्व ३००च्या काळात लिहिल्या गेलेल्या अनेक अशोक साम्राज्यकालीन शिलालेखांमध्ये याचे संदर्भ आढळतात. ब्राह्मी लिपीचा वापरसर्वसामान्य लोक ज्या प्राकृत भाषेतून बोलत असत त्या भाषेतून लिहिण्यासाठी अधिक प्रमाणात केला गेल्याचे दाखले यावरून मिळाले आहेत. संस्कृतमधील सर्व अक्षरे (स्वर आणि व्यंजने) तसेच आधुनिक भाषांमधील मध्य लयीतील स्वर ब्राह्मी लिपीमध्ये असल्याचे आढळले.

ब्राह्मी लिपीमध्ये कालानुरूप अनेक बदल झाले आणि इसवी सन पूर्व ३०० च्या सुमारास वापरल्या जाणाऱ्या ब्राह्मी लिपीचे स्वरूप अधिक आकर्षक आणि वळणदार झाले. इसवी सन पूर्व २०० च्या सुमारासवापरात असलेल्या ब्राह्मी लिपीमध्ये आपल्याला हा बदल स्पष्टपणे पहायला मिळतो. अर्थात हा बदल झाला तरीहीसंस्कृतच्या मूलभूत स्वरांना आणि व्यंजनांना समाविष्ट करणारा अक्षरांचा संच मात्र तोच राहिला.हा अक्षरांचा संच पुढे वेगवेगळ्या भारतीय भाषांमध्ये विविध स्वरूपात वापरला गेला.



तीन व्याकरणकार

तामिळनाडूमधील दिमाखदार मंदिरे त्यांच्या अद्वितीय द्रविड शैलीतील स्थापत्यशास्त्रासाठी प्रसिध्द आहेत.अशाच द्रविड शैलीतील सुप्रसिद्ध चिदंबरम मंदिरात जैमिनी, व्याघ्रपद आणि पतंजली (डावीकडून उजवीकडे) या तीन ऋषींची शिल्पे आहेत. असे मानले जाते की जैमिनी हे इसवी सन पूर्व ४थ्या शतकातील एक महान विद्वान होते आणि त्यांनी 'मीमांसा सूत्र' व 'जैमिनी सूत्र'हे दोन ग्रंथ लिहिले. 'मीमांसा सूत्र'हा भारतीय तत्त्वज्ञानाच्या सुरुवातीच्या ग्रंथांपैकी एक ग्रंथ असून तो बारा अध्यायांच्या स्वरूपात लिहिलेला आहे. या ग्रंथामध्ये वेदांचे स्पष्टीकरण दिलेले असून वैदिक विधींचे पालन करण्यासाठी योग्य त्या सूचना दिलेल्या आहेत. व्याघ्रपद या ऋषींनी चिदंबरमच्या स्थलपुराणाचे महत्त्वस्पष्ट करणारा ग्रंथ लिहिला. इसवी सन पूर्व २च्या सुमारास 'महाभाष्य'आणि 'योगसूत्र' या ग्रंथांची निर्मिती करणाऱ्या पतंजली ऋषींनी संस्कृत भाषेत लक्षणीय योगदान दिले आहे. 'महाभाष्य'हा ग्रंथ म्हणजेपाणिनींच्या व्याकरणाच्या परंपरेतील एक महत्वपूर्ण अभ्यासग्रंथ आहे. 'योगसूत्र'या संस्कृत ग्रंथामध्ये योगशास्त्र विषयक सिद्धांत आणि त्याचे आचरण कसे करावे यावर 'समाधी पद', 'साधना पद', 'विभूती पद' आणि 'कैवल्य पद' या चार प्रकरणांतून विवेचन केलेले आहे.

गुरुकुल पद्धती

प्राचीन ज्ञानाचा विपुल प्रमाणात समृद्ध वारसा ५०००वर्षांहून अधिक काळ लाभलेला आपला भारत देश गुरु आणि गुरुकुल यांची भूमी म्हणून ओळखला जातो. प्राचीन भारतामध्ये 'गुरुकुल' हे शिक्षणाचे प्रमुख केंद्र होते. गुरुकुल शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थी त्यांच्या गुरूच्या आश्रमामध्ये राहत आणि वेद व पवित्र ग्रंथ आणि इतर विषयांचा अभ्यास करत.मंत्रोच्चारण, व्याकरण, खगोलशास्त्र, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, युद्धकला, ललित कला इत्यादींचे ज्ञान गुरुंच्या मार्गदर्शनाखाली किमान ९ते १२वर्षांच्या कालावधीसाठी हे विद्यार्थी घेत. गुरू त्यांच्या विद्यार्थ्यांची क्षमता ओळखून त्यानुसार ज्ञान देत असत.

आश्रमाच्या नैसर्गिक परिसरामध्ये, खुल्या वातावरणात, निसर्गाच्या सानिध्यात राहून विद्यार्थ्यांनी वेद आणि इतर शास्त्रांचे ज्ञान घेत असत. गुरुकुल शिक्षण पद्धती ही 'सर्वांगीण मानवी विकास' या संकल्पनेवर आधारित होती. यामध्ये शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक विकास यांकडे लक्ष दिले जात असे. प्रत्यक्ष अनुभव हा सर्वोत्तम शिक्षक आहे, या तत्त्वावर ही शिक्षण प्रणाली आधारित होती. महान गुरु, कलाकार, तत्त्वज्ञ आणि नोबेल पुरस्कार विजेते रवींद्रनाथ टागोर यांनी स्थापन केलेले शांतिनिकेतन गुरुकुल या प्राचीन पद्धतीवरच आधारित आहे



भारतीय अभिजात भाषा

अभिजात भाषा

- தமிழ் तमिळ (since 2004)
- संस्कृत संस्कृत (since 2005)
- తెలుగు तेलगू (since 2008)
- ಕನ್ನಡ कन्नड (Since 2008)
- മലയാളം मल्याळम (since 2013)
- ଓଡ଼ିଆ ऊडिया (since 2014)

ज्या भाषांना स्वत:ची स्वतंत्र साहित्यिक परंपरा आहे आणि मोठ्या प्रमाणावर ज्या भाषांमधून साहित्य निर्मिती झाली आहे अशा सहा भारतीय भाषांना भारत सरकारने 'अभिजात भाषा' म्हणून मान्यता दिली आहे. या सहा भाषांमध्ये तमिळ, तेलगू, संस्कृत, कन्नड, मल्याळम आणि ऊडिया या भाषांचा समावेश आहे.

ज्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे एखाद्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला जातो अशी मार्गदर्शक तत्वे सांस्कृतिक मंत्रालयाने प्रकाशित केली आहेत. ही तत्वे पुढीलप्रमाणे -

- सुमारे १५०० ते २००० वर्षांपूर्वीच्या काळातील ग्रंथ किंवा नोंदींची उपलब्धता
- तज्ज्ञ व्यक्तींच्या अनेक पिढ्या ज्याला प्राचीन वारसा मानतात अशा साहित्याचा किंवा ग्रंथांचा काही भाग
- दुसऱ्या समुदायाकडून न घेतलेली आणि स्वतंत्र साहित्यिक परंपरा
- अभिजात भाषा आणि साहित्य या दोन बाबी भिन्न असल्याने मूळ अभिजात भाषा आणि तिचे कालांतराने निर्माण झालेले स्वरूप यामध्ये फरक असू शकतो.

भारतीय भाषा सर्वेक्षण हे ब्रिटीशांच्या अंमलाखाली असताना केलेले भारतातील भाषांचे सर्वसमावेशक सर्वेक्षण आहे. हे सर्वेक्षण सर्वप्रथम भारतीय नागरी सेवेचे सदस्य असलेल्या भाषातज्ज्ञ जॉर्ज अब्राहम ग्रियर्सन यांनी प्रस्तावित केले होते.त्यांनी सप्टेंबर 1886 मध्ये व्हिएना येथे आयोजित सातव्या आंतरराष्ट्रीय ओरिएंटल कॉंग्रेस परिषदेमध्ये भाग घेतला होता. त्यांनी भाषा सर्वेक्षणाचा प्रस्ताव मांडला; पण सुरुवातीला त्यावेळच्या भारत सरकारने तो प्रस्ताव नाकारला. मात्र उपलब्ध असलेल्या सरकारी व्यवस्थेचा वापर करून वाजवी खर्चात हे सर्वेक्षण केले जाऊ शकते असे ग्रियर्सन यांनी पटवून दिल्यानंतर १८९१मध्ये सर्वेक्षणाचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. पण हे सर्वेक्षण प्रत्यक्षात सुरु होण्यासाठी १८९४ साल उजाडले. आणि १९२८ पर्यंत म्हणजे तीस वर्षांपेक्षा अधिक काळ हे सर्वेक्षण सुरु राहिले. या सर्वेक्षणातून केला गेलेला अभ्यास ११ खंडांमधून प्रकाशित करण्यात आला. या सर्वेक्षणात ३६४ भारतीय भाषा आणि बोलीभाषांचे विवेचन करण्यात आले आहे.

जॉर्ज अब्राहम ग्रियर्सन
आणि
भारतीय भाषा सर्वेक्षण

& GEORGE A GRIERSON
Linguistic Survey of India



विविध वस्त्रांवरील भाषा

भारतीय भाषांमधील विविधता आपला समाज,संस्कृती आणि कला यांच्याशी अतूटपणे जोडलेली आहे.याचा पुरावा आपल्याला विविध प्रकारच्या वस्त्रांवर पहायला मिळतो. विणकाम, भरतकाम आणि लाकडी ठोकळ्याच्या मदतीने कापडांवर केली जाणारी छपाई अशा विविध पद्धती वापरून वस्त्रांवर मजकूर लिहिला जातो.

दैनंदिन जीवनातली भाषा

साहित्य हा दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. साहित्यामध्ये मानवी जीवनातील अनेक भाव-भावनांचे प्रतिबिंब उमटल्याचे आपल्याला आढळून येते. असे असले तरी साहित्य हे अनेकदा उपयुक्त किंवा फायदेशीरसुद्धा ठरते. अशा साहित्याचे वाचकसुद्धा पारंपरिक साहित्याच्या वाचकांपेक्षा भिन्न असतात. उदाहरणार्थ, विविध चटया, खेळात वापरले जाणारे पत्ते, विविध कापडांचे नमुने, हस्तकला अशा स्वरूपात किंवा अगदी एखाद्या चित्रावर लिहिलेल्या मजकूराच्या स्वरूपात आपल्या घरातील टेबल, फरशी किंवा कपाटांपर्यंत आपेला आपल्यापर्यंत पोहोचवित असतो.

LANGUAGE IN LIFE

टॅरो कार्ड

अनेक शतकांपासून विविध खेळांमध्ये वेगवेगळ्या प्रकारे भाषा वापरली जाते. याचे सर्वांत जुने उदाहरण म्हणजे जगभरात लोकप्रिय असलेली 'टॅरो कार्ड'. भविष्य आणि गूढविद्या यांचे विवेचन करण्यासाठी १७८० मध्ये फ्रान्समध्ये टॅरो कार्ड सर्वप्रथम वापरण्यात आली. त्यानंतर ब्रिटिश गूढविद्यातज्ज्ञ आर्थर व्हेट आणि कलाकार पामेला कोलमनस्मिथ यांनी १९०९मध्ये जारी केले जे रायडर-व्हेटटॅरो कार्डांच्या संचाची निर्मिती केली. टॅरो कार्ड चीनी, इंग्रजी आणि इतर प्रमुख भाषांमध्ये संपूर्ण जगभरात आज उपलब्ध आहेत.

ट्रक

भारतात ट्रक हे केवळ माल वाहतुकीपुरते मर्यादित नाहीत, तर त्यांच्या माध्यमातून रंजक साहित्यिक निर्मितीदेखील होत असल्याचे आढळते. अनेक ट्रकवर काव्यात्मक, अलंकारिक वाक्ये लिहिली असल्याचे आपण वाचतो. ट्रकवर लिहिल्या जाणाऱ्या साहित्यात विविधता आढळते. यामध्ये देशभक्ती, लोकशिक्षण, धर्म, प्रादेशिक वैशिष्ट्ये अशा वेगवेगळ्या विषयावर शायरी, दोहे, काव्यपंक्ती, सुविचार लिहिल्याचे आढळते. यामध्ये आपले घर, आपली ओळख, आपला प्रदेश किंवा गाव, प्रवास, एकटेपणा यांच्याशी निगडीत साहित्य लिहिल्याचे बऱ्याचदा दिसते. ट्रकवर लिहिले जाणारे हे साहित्य लोकप्रिय आहे. या लिखाणातून चालक, मालक आणि मदतनीस यांच्या कल्पना प्रतिबिंबित होत असतात. ट्रकवर लिहिलेले हे साहित्य छापील मजकुराच्या सीमा ओलांडते आणि ट्रकच्या प्रवासाबरोबर दूरवर प्रसारित होते.

लोहस्तंभावरील लेखन - इतिहासाचा मागोवा घेण्यासाठी असलेला एक भाषिक पुरावा

दिल्लीतील कुतुबमिनारच्या परिसरात क्वावत-उल-इस्लाम मशिदीच्या प्रांगणात असलेला पूर्णपणे गंजरहित भव्य लोहस्तंभ हे एक आश्चर्य मानले जाते. यावर ४व्या - ५व्या शतकात संस्कृत भाषेतून जी मजकूर लिहिला आहे त्यामध्ये 'चंद्र' नावाच्या राजाच्या कामगिरीचे वर्णन केल्याचे आढळते. हा राजा गुप्त साम्राज्यातील राजा चंद्रगुप्त दुसरा (इसवी सन ३७५-४१३) असल्याचे मानले जाते. संस्कृत भाषेतील हा प्राचीन मजकूरब्राह्मी लिपी मध्ये लिहिला असूनचौथ्या - पाचव्या शतकातील असून या लिपीला उत्तर आणि मध्य भारतावर ४व्या ते ७व्या शतकात राज्यकारभार केलेल्या गुप्त साम्राज्यावरून 'गुप्त-ब्राह्मी' लिपी असे संबोधले गेले. हा मजकूर आणि गुप्त काळातील सोन्याच्या नाण्यांसारख्या इतर पुरातत्व संदर्भांमुळे दिल्लीच्या लोहस्तंभाच्या इतिहासाचा उलगडा होण्यास मदत झाली आहे आणि असे सिध्द झाले आहे की हा लोहस्तंभ सुरुवातीला ५ व्या शतकात मध्य प्रदेशातील उदयगिरी येथे उभारण्यात आला होता.



सिंधूच्या खोऱ्यातील हस्तलिखिते

INDUS LANGUAGE



१९२० मध्ये झालेल्या उत्खननामुळे सिंधू नदीच्या खोऱ्यातील समाजजीवन कसे होते याचा उलगडा झाला. पण तरीसुद्धा भारतीय समाजजीवनाने जी लिपी दिली जी आजपर्यंत अज्ञात आहे. देवनागरीसारख्या प्राचीन भारतीय लिपींशी कोणतेही ज्ञात द्विभाषिक भाषांतर किंवा कोणताही परस्परसंबंध यामध्ये सापडला नाही.

जुलै २०१९ मध्ये पश्चिम बंगालमधील एक माहिती तंत्रज्ञान उद्योजक बहाता अंगशुमाली मुखोपाध्याय यांचा सिंधू नदीच्या खोऱ्यातील शिलालेखांमध्ये सापडलेल्या लिपीसंदर्भात नेचर ग्रुपच्या पालग्रेव्ह कम्युनिकेशन्स या संशोधनपर मासिकात एक लेख प्रसिद्ध झाला आहे. या लेखात त्यांनी म्हटले आहे की सिंधूच्या खोऱ्यात मिळालेल्या लिपीमध्ये चीनी लेख प्रणालीसारखे एक चिन्ह किंवा एक अक्षर संपूर्ण शब्द दर्शवते. याच लेखात मुखोपाध्याय पुढे असा दावा करतात की हडप्पा लिपी ही आधुनिक काळातील शिक्के, नाणी आणि टोकनवर दिसणाऱ्या सांकेतिक संदेशांशी मिळतीजुळती आहे.

बौद्ध लिपी || Buddhist sacred manuscript ||

बौद्ध लिपी हा बौद्ध धर्माचा पाया आहे. या भाषेतून बुद्धाचे पवित्र विचार' सूत्र' म्हणून लिहिलेले आढळतात. उदाहरणार्थ, मजकूर, भाषा आणि लिपीचे महत्त्व सुखवाटिव्यूह सूत्रामध्ये सांगितले आहेत. यामध्ये उत्तम मजकूर केवळ ऐकणे, वाचणे किंवा शिकणे इतकेच पुरेसे नसून हा मजकूर व्यवस्थित पद्धतीने लिहून जतन केला पाहिजे, असे विचार व्यक्त केले आहेत. याच विचारामुळे ग्रंथ निर्मिती करणे आणि त्याच्या प्रती काढणे या विचाराचा प्रसार झाला. विशेषत: लहान प्रार्थना ठिकठिकाणी छापल्या जाऊ लागल्या. या प्रार्थना मातीच्या गोळ्यांवर छापण्यासाठी किमान ७ व्या शतकापासून ठशांची निर्मिती करण्यात आली होती. 'प्रज्ञापारमिता' हा अंदाजे इसवी सन पूर्व १०० ते इसवी सन ६०० या कालावधीत भारतीय उपखंडात रचलेल्या सुमारे चाळीस ग्रंथांचा संग्रह आहे. यामध्ये बौद्ध धर्माची मध्यवर्ती संकल्पना, मुख्यत: शून्यतेचा किंवा त्यागाचा सिद्धांत स्पष्ट करण्यात आला आहे. त्रिपिटक, महायान सूत्र आणि तिबेटीयन बुक ऑफ द डेड अशा इतरही ग्रंथांची या काळात निर्मिती झाली.



प्राचीन हस्तलिखिते

आपल्या देशाच्या अनेक भागांमध्ये ऐतिहासिक काळातील प्राचीन शिलालेख सापडतात. तांब्याच्या तवकांवर कोरलेली देणगीची पत्रे, शाही हुकूम, सनदी सापडलेल्या असून पुरातत्वदृष्ट्या हे दस्तऐवज महत्त्वपूर्ण आहेत. या दस्तऐवजांवर राजमोहर उमटवल्याचे देखील आढळते. याचाच अर्थ, या दस्तऐवजांना कायदेशीर मान्यता देण्यात आली होती. 'सोहगौर' हे ब्राह्मी लिपीत लिहिलेले हे ताम्रपत्र इसवी सन पूर्व तिसऱ्या शतकातील मौर्य साम्राज्य दरम्यानचे असून ते सर्वात प्राचीन ताम्रपत्र असल्याचे मानले जाते.

भारतीय हस्तलिखित मोहिम, सांस्कृतिक मंत्रालयाचे इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्र तसेच विविध प्राच्यविद्या अभ्यास संस्थांनी इतिहासाच्या विविध कालखंडातील हस्तलिखिते जमा केली आहेत. या संस्थांच्या ताब्यात असलेल्या विद्यमान हस्तलिखितांची संख्या काही हजारांमध्ये आहे. मात्र अजूनही विविध ऐतिहासिक कालखंडातील असंख्य हस्तलिखिते विविध व्यक्ती आणि खाजगी मंदिर संस्थांच्या ताब्यात आहेत.

कागदनिर्मिती

PAPER MAKING

तलासजवळ ७५१ साली झालेल्या अटलाखच्या लढाईनंतर समरकंद येथे आणलेल्या चीनी युद्ध कैद्यांनी चीनमध्ये वापरल्या जाणाऱ्या पद्धतींवर आधारित ताग, अंबाडी किंवा भांग या वनस्पतींच्या तंतुंपासून कागद तयार करण्याचे तंत्र सर्वप्रथम सादर केले.

इब्न अल-नदिमने आपल्या 'अल-फिहरिस्ती' या पुस्तकात लिहिले आहे :"चिनी लोक वनस्पतींपासून तयार केलेल्या चिनी बनावटीच्या कागदावर लिहितात. कागद निर्मितीचा हा उद्योग चीनमधील शहरांसाठी उत्पन्नाचा एक उत्तम स्रोत आहे. अरब लोक कागद निर्मितीचे तंत्र चिनी कैद्यांकडून समरकंद येथे शिकले आणि मग हे तंत्र पश्चिमेकडे पसरत गेले". अल-बिरूनी याने असेही म्हटले आहे की, "चिनी कैद्यांनी समरकंदमध्ये दाखवलेले कागद निर्मितीचे तंत्र जगाच्या इतर भागात पसरले". कागदनिर्मितीचे तंत्रज्ञान अरब लोकांपर्यंत पोहोचल्यानंतर त्यांनी या तंत्रामध्ये सुधारणा घडवून आणल्या. तागाच्या तंतूंप्रमाणे अंबाडी आणि इतर वनस्पतींचे तंतू कागद तयार करण्यासाठी वापरायला सुरुवात केली. अरबांनी सिंधवर विजय मिळवल्यानंतर, खुरसानी कागद पहिल्यांदा इसवी सन आठव्या शतकाच्या सुरुवातीला भारतामध्ये आणला गेला आणि पुढे कित्येक शतके या कागदाची आयात केली गेली.

मात्र भारतीय बनावटीच्या कागदनिर्मिती संदर्भात अशा नोंदी सापडल्या आहेत की, मर्यादित प्रमाणात का होईना पण दिल्ली आणि लाहोर या राजकीय आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या शहरांमध्ये कागदनिर्मितीचा उद्योग यापूर्वीच स्थापन झाला होता.

भारतामध्ये पहिला कागद कारखाना काश्मीरमध्ये विकसित झाला. इसवी सन १४१७ -६७ या काळातील काश्मीरचा सुलतान जैनुल आबेदीन (शाही खान) याने हा कागद कारखाना स्थापन केला होता. वास्तविक त्याचे वडील सुलतान सिकंदर (इसवी सन १३८६ -१४१०) हे तैमूरले भारतावर केलेल्या आक्रमणाच्या वेळी (इसवी सन १३९८) काश्मीरवर राज्य करत होते. सुलतान सिकंदरने आपला मुलगा शाही खान याच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ तैमूरकडे पाठवले आणि मैत्रीचा प्रस्ताव पाठवला. त्यावर तैमूरने सुलतान सिकंदरला एका बैठकीसाठी बोलावले. पण दरम्यानच्या काळात घडलेल्या राजकीय घडामोडींमुळे त्याला भारत सोडण्यास भाग पडले. तो घाईघाईने समरकंदला निघून गेला. पण समरकंदला जाताना आपल्यासोबत शाही खानला घेऊन गेला आणि आपल्या मृत्यूपर्यंत त्याला अक्षरशः ओलीस ठेवले. शाही खान अनेक कारागीर आणि विविध व्यवसायात कुशल कामगारांना घेऊन काश्मीरला परत आला आणि तेथे त्याने नवीन उद्योगधंद्यांना सुरुवात केली. यामध्ये कागद बनवणारे, पुस्तक बांधणी करणारे,शाली तयार करणारे आणि सुईणी यांचा समावेश होता. तारिख-ए-काश्मीर या ग्रंथाच्या लेखकाने शाही खानबद्दल लिहिले आहे, "समरकंद येथे मुक्कामाला असताना त्याने ज्ञान प्राप्त केले. काश्मिरला परतताना त्याने कागदनिर्मिती, पुस्तक बांधणी अशा विविध व्यवसायात कुशल असलेल्या; तसेच शाली तयार करणाऱ्या, गालिचे विणणाऱ्या कारागीरांना आणि प्रशिक्षित सुईणींना आपल्याबरोबर काश्मीरमध्ये आणले".

चांगल्या दर्जामुळे काश्मिरी कागदाला हस्तलिखिते लिहिण्यासाठी उर्वरित देशातून आणि संपूर्ण जगातून अल्पावधीतच मोठी मागणी आली. तारिख-ए-फरिश्ता या ग्रंथात उल्लेख केल्याप्रमाणे,"सुलतान अबू सईदने सुलतान जैनुल आबेदीन यांना भेट म्हणून उत्तम अरबी घोडे आणि चांगल्या जातीचे उंट पाठवले. या सौजन्यपूर्ण आदरातिथ्यामुळे प्रसन्न झालेल्या सुलतान झैनुल आबेदीनने त्याच्या बदल्यात सुलतान अबू सईदला केशर, कागद, कस्तुरी, अत्तर,गुलाबपाणी, व्हिनेगर, मनमोहक शाली, काचेच्या वाट्या आणि काश्मीरमध्ये तयार करण्यात आलेली उत्तम प्रतीची उत्पादने भेट म्हणून पाठवली.

THE PIETY OF THE WRITING RITUALS IN INDIA

भारतातील विधींच्या लेखनामधील धार्मिकता

लहान मुलांना शिक्षण देण्याची सुरुवात विधिवत केली जात असे. या विधीला 'विद्यारंभम्' किंवा 'अक्षरभ्यासम्' असे संबोधले जात असे. प्राचीन काळापासून भारतात ही प्रथा पाळली जात होती आणि हे विधी विद्येची देवता असलेल्या देवी सरस्वतीला स्मरून केली जात असे. सर्वसाधारणपणे नवरात्रीच्या शेवटच्या दिवशी किंवा विजयादशमीला या विधींचे आयोजन केले जात असे.

विद्यारंभम् या विधीमध्ये, २ ते ५ वर्षे वयोगटातील मुलांना औपचारिकपणे भाषेची ओळख करून दिली जात असे. हा विधी आजही भारतात प्रामुख्याने आंध्र प्रदेश, तेलंगणा, केरळ, तामिळनाडू आणि कर्नाटक या दक्षिणेकडील राज्यांमध्ये प्रचलित आहे. कर्नाटकात कोल्लूर मूकाम्बिका मंदिरात 'अक्षरभ्यास' नावाने हा विधी प्रचलित आहे.

चित्रपटाचे जाहिरात फलक (पोस्टर)

'राजा हरिश्चंद्र' या चित्रपटापासून सुरु झालेला भारतीय चित्रपटांचा प्रवास आजही अव्याहतपणे सुरु आहे. या चित्रपटांच्या जाहिरात फलकांचाही प्रवास चित्तवेधक रंगांचा वापर करून काढलेली चित्रे आणि कलात्मकरीत्या लिहिलेल्या मजकुरापासून ते गुळगुळीत कागदावर डिजीटल छपाई करण्यापर्यंत झाल्याचे आपल्याला आढळते. चित्रपटाच्या जाहिरातीचे मुख्य माध्यम असलेले चित्रपटांचे जाहिरात फलक हे एक शतकाहून अधिक काळ कलाप्रेमी, इतिहासकार आणि पुरातन वस्तू संग्राहक यांच्या अभ्यासाचा विषय ठरले आहेत. भारतासारख्या देशात, जिथे भाषिक, धार्मिक आणि प्रादेशिक विविधता आहे तिथे हिंदी, तमिळ, तेलुगु, बंगाली, भोजपुरी, कन्नड, मल्याळम, मराठी आणि पंजाबी भाषेतील हे जाहिरात फलक चित्रपट उद्योगातील लोकांना एकत्र आणण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. त्याचप्रमाणे, चित्रपटांच्या या जाहिरात फलकांमध्ये त्या-त्या काळातील लोकांची सांस्कृतिक विचारसरणी, कल्पनाशक्ती, मांडणी आणि सादरीकरणाचे कौशल्य, तंत्रज्ञानातील बदल इत्यादी बाबींचे प्रतिबिंब पाहायला मिळते.









छपाई माध्यमातील भाषेची विविधता

छपाई तंत्रज्ञान गोवामार्गे भारतात दाखल झाले. ३० एप्रिल १५५६ या दिवशी लोयोलाच्या सेंट इग्नाटियसला लिहिलेल्या पत्रात फादर गॅस्पर कॅलेझा यांनी पोर्तुगालहून एबिसिनियाला छपाई यंत्र घेऊन निघालेल्या जहाजाविषयी लिहिले आहे. अॅबिसिनियामध्ये मिशनरी कार्यात मदत करण्यासाठी हे छपाई यंत्र पोर्तुगालमधून नेण्यात येत होते. १५५९ मध्ये गोव्यात सर्वप्रथम छपाईचे काम सुरू झाले. पहिल्या छापखान्याची स्थापना जुन्या गोव्यातील जेसुइट सेंट पॉल महाविद्यालयामध्ये झाली. २० ऑक्टोबर १५७८ रोजी भारतीय भाषेत लिहिलेले भारतातील पहिले पुस्तक छापण्यात आले. मात्र १७०६ पर्यंत डॅनिश मिशनरी बार्थोलोमियस झिगेनबल्ग थारंगेबडी येथे येईपर्यंत भारात मोठ्या प्रमाणावर छपाई होऊ शकली नाही. झिगेनबल्ग्याच्या पुढाकाराने १७१३मध्येपहिले तमिळ प्रकाशन छापले जाऊन मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहोचले.

भारतातील स्वातंत्र्य लढ्यात वृत्तपत्रांनी मोलाची भूमिका बजावली. आशियातील पहिले वृत्तपत्र , हिकीज 'बंगाल गॅझेट' हे इंग्रजी साप्ताहिक वृत्तपत्र होते, जे 1780 मध्ये कोलकात्यात छापले गेले. 1818 पासूनबंगाल गॅझेट हे वृत्तपत्र पूर्णपणे स्थानिक लोकांच्या योगदानातूनछापले जाऊ लागले. राष्ट्रीय प्रबोधनास मदत करणारी इतर उल्लेखनीय वृत्तपत्रे पुढीलप्रमाणे होती- बेंगदूत (बंगाली, हिंदी, इंग्रजी, फारसी भाषेतून), पहिले हिंदी दैनिक- समाचार सुधावर्शन, पायम-ए-आझादी (उर्दू आणि हिंदी भाषेतून) दूरबीन (उर्दू भाषेत) आणि सुलतान-उल-अखर (फारसी भाषेतून) हिंदू पेट्रिऑट (इंग्रजीतून), केसरी (मराठीतून), यंग इंडिया (इंग्रजीतून), नवजीवन (हिंदीतून), आणि वंदे मातरम (उर्दू भाषेतून).



साहित्य अकादमी पुरस्कार

ज्ञानपीठ पुरस्कारव्यतिरिक्त केंद्र सरकार साहित्य अकादमीच्या माध्यमातून भारतीय साहित्यकृतींचा सन्मान करते.

साहित्य अकादमी ही भारत सरकारने देशभरातील साहित्यिक आदानप्रदान, प्रकाशन आणि साहित्यकृतींच्या प्रचारासाठी राष्ट्रीय स्तरावर स्थापन केलेली एकमेव स्वायत्त संस्था आहे. या संस्थेची स्थापना १२ मार्च १९५४ रोजी झाली आणि तेव्हापासून अकादमीने इथंसिस २४ भारतीय भाषांमध्ये विविध साहित्यिक उपक्रम राबवले. या प्रत्येक भारतीय साहित्यिक कलाकृतींना या संस्थेमार्फत दरवर्षी २४ पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.

ज्ञानपीठ पुरस्कार

कला, संस्कृती आणि साहित्य ही थेरे प्राचीन कळाप्रसून राजाकडील आश्रयाखाली भरभराटीला आले आहेत. सर्वसामील आणि साहित्यिक विद्वानांना राजाश्रय देण्याची ही प्राचीन परंपरा आजही कायम आहे. साहित्य क्षेत्रात भारतातील साहित्यकृतींसाठी दिला जाणारा ज्ञानपीठ पुरस्कार हा देशातला सर्वोच्च साहित्यिक सन्मान मानला जातो. ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान करण्याची सुरुवात १९६५ साली साहू या जैन कुटुंबाने केली होती. साहित्यिक क्षेत्रासाठी दरवर्षी देण्यात येणारा हा पुरस्कार भारतातील कोणत्याही अधिकृत भाषेत साहित्य निर्मिती करणाऱ्या भारतीय नागरिकाला दिला जाते. हा पुरस्कार मिळवणारे पहिले लेखक जी. शंकर कुरुप हे होते. त्यांना १९६५ साली हा पुरस्कार त्यांच्या ओडक्कुझल (बांबूची बासरी) या मल्याळम् भाषेतून लिहिलेल्या काव्यरचनेसाठी प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मिळवणाऱ्या पहिल्या महिला लेखिका आशापूर्णा देवी या होत्या. त्यांना बंगाली भाषेतून केलेल्या साहित्यकृतीबद्दल १९७६ साली ज्ञानपीठ पुरस्कार देण्यात आला होता. होत्या. रोख बक्षीस, सन्मानपत्र आणि ज्ञान, संगीत आणि कलांची देवता असलेल्या देवी सरस्वतीची कांस्य मूर्ती असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. १९८६ सालापर्यंत ज्ञानपीठ पुरस्कार केवळ एकाच साहित्यकृतीसाठी दिला जात असे. पण १९८६ जैन लेखकांना त्यांच्या 'भारतीय साहित्यातील आजीवन योगदानासाठी जीवन गौरव' या स्वरूपात ज्ञानपीठ पुरस्कार दिला जातो.

सन्माननीय व्यक्तींची हस्तलिखित पत्रे



सध्याच्या डिजिटल युगात हाताने लिहिलेले ग्रंथ, लेख किंवा पत्रे जवळजवळ नामशेष होत आहेत. परंतु आजही महान नेते, स्वातंत्र्य सैनिक किंवा राष्ट्रनिर्माते, शास्त्रज्ञ, साहित्यिकस्वत:च्या हस्ताक्षरात लिहिलेलामजकूर किंवा पत्रेनवीन पिढीला प्रेरणा देतात आणि जुन्या काळातील आठवणींना उजाळा देतात. स्वत:च्या हस्ताक्षरात लिहिलेल्या मजकूरातून लेखकाचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित होते आणि या मजकुराशी एक प्रकारचे भावनिक नाते निर्माण होते.म्हणूनच कीबोर्डचा वापर करून लिहिल्या जाणाऱ्या सध्याच्या मुद्रित मजकुराच्या जमान्यात या हस्तलिखित मजकुराचे महत्व मुळीच कमी होणार नाही.सन्माननीय व्यक्तींनी स्वत:च्या हाताने लिहिलेली पत्रे ही सध्याच्या पिढ्यांसाठी एक अमूल्य खजिना आहेत. स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, अल्बर्ट आइन्स्टाईन, जॉर्ज बर्नार्ड शॉ, सत्येंद्रनाथ बोस आणि जगदीशचंद्र बसू यांनी स्वत:च्या हस्ताक्षरात लिहिलेली काही पत्रे येथे प्रदर्शित करण्यात आली आहेत.

संज्ञानात्मक शिक्षण आणि मातृभाषा



संज्ञानात्मक शिक्षण घेण्यासाठी मातृभाषा शिकणे आवश्यक आहे.मातृभाषा मुलाच्या मानसिक, भावनिकआणिनैतिक विकासासाठी मदत करते. मातृभाषा आणि संज्ञानात्मक विकास यामध्ये घनिष्ट संबंध असल्याचे वेगवेगळ्या अभ्यासामधून गण्ट झाले आहे. या अभ्यासांमधून असेही दिसून आले आहे की ज्यामुलांना त्यांची मातृभाषा चांगली येते ती मुले अत्यंत चांगली शैक्षणिक प्रगती करू शकतात आणि ज्या मुलांना विविध भाषांचे ज्ञान असते अशा मुलांच्या बौद्धिक क्षमतांचा विकास चांगल्या प्रकारे झालेला असतो.

भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांमध्ये बहुभाषिक कौशल्यांना प्रोत्साहन दिले जाते आणि शालेय शिक्षणात विद्यार्थ्यांना दोन ते तीन भाषा शिकविण्यात येतात.यामध्ये मातृभाषा, राज्यभाषा, हिंदी किंवा संस्कृत आणि इंग्रजी या भाषांचा प्रामुख्याने विचार केल्याचे आढळते. भारतात शिकवल्या जाणाऱ्या भाषांमध्ये राज्यघटनेतील सर्व

22 अनुसूचित भाषा; अरबी, इंग्रजी, फ्रेंच, पोर्तुगीज, रशियन आणि जपानी यांसारख्या अनेक विदेशी भाषा;तसेच संस्कृत आणि फारसी यांसारख्या पारंपरिक भाषा;गोंडी, भिल्ल आणि कोरकूयांसारख्या मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या आदिवासी लोकांच्या भाषा; आणि मिझो, खासी, गारो, तुलु, कच्छी, कुमाऊनी आणि गढवाली इत्यादी काही अनुसूचित नसलेल्या राज्यभाषांचा समावेश आहे.

मात्र, भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये मातृभाषेच्यापर दिवसेंदिवस कमी होत चालल्याबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. भाषिक विविधता हा भारताच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा अविभाज्य भागआहे. त्यामुळे आपल्या भाषा वाचवणे आणि त्यांना बळकट करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे महत्त्वाचे कर्तव्य आहे.

THE CONSTITUTION OF INDIA

Preamble

WE, THE PEOPLE OF INDIA, having solemnly resolved to constitute India into a **SOVEREIGN DEMOCRATIC REPUBLIC** and to secure to all its citizens:

JUSTICE, social, economic and political;

LIBERTY of thought, expression, belief, faith and worship;

EQUALITY of status and of opportunity; and to promote among them all

FRATERNITY assuring the dignity of individual and the unity of the Nation;

IN OUR CONSTITUENT ASSEMBLY this twenty-sixth day of November, 1949, do **HEREBY ADOPT, ENACT AND GIVE TO OURSELVES THIS CONSTITUTION.**

आठव्या अनुसूचीनी संबंधित भारतामध्ये संघटनी राज्यघटनेच्या अनुच्छेद ३४ (१) आणि ३४१मध्ये आहेतशत. ज्यांचेसी राज्यघटना पूर्ण झाली, त्या वेळी या घटीत एकाही भाषा समाविष्ट केल्याचा अर्थ असा होता की ती भाषा हिंदी आणि इंग्रजी या अधिकृत भाषांना समृद्ध करण्यासाठी वापरण्यात येईल.

राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीमध्ये खालील २२ भाषांचा समावेश आहे:-(१) आसामी, (२) बंगाली, (३) गुजराती, (४) हिंदी, (५) कन्नड, (६) काश्मिरी, (७) कोंकणी, (८) मल्याळम, (९) मणिपुरी, (१०) मराठी, (११) नेपाळी, (१२) ओरिया, (१३) पंजाबी, (१४) संस्कृत, (१५) सिंधी, (१६) तमिळ, (१७) तेलगू, (१८) उर्दू, (१९) बोडो, (२०) संथाली, (२१) मैथिली आणि (२२) डोगरी.

या २२ भाषांपैकी सुरुवातीला १४भाषांचा समावेश राज्यघटनेत करण्यात आला होता. १९६७मध्ये सिंधी भाषा या घटीत समाविष्ट करण्यात आली. पुढे १९९२ मध्ये कोंकणी, मणिपुरी आणि नेपाळी या आणखी तीन भाषांचा समावेश करण्यात आला. त्यानंतर २००४ मध्ये या घटीत बोडो, डोगरी, मैथिली आणि संथाली या भाषा समाविष्ट करण्यात आल्या.

राष्ट्रीय एकात्मता आणि भाषिक विविधता

'मिले सूर मेरा तुम्हारा'हे गीत भारतातील भाषिक विविधता आणि विविध भाषांमध्ये असलेली मोहकता,सर्जनशीलता यांचा प्रकाश टाकते. दिल्लीच्या लाल किल्ल्यावरून स्वातंत्र्यदिनाला होणारे भारताच्या पंतप्रधानांचे भाषण ही आपल्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण घटना असून दूरदर्शनच्या माध्यमातून देशातील करोडो लोक या घटनेचे साक्षीदार होतात. १५ ऑगस्ट १९८८ रोजी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी राष्ट्राला उद्देशून भाषण दिल्यानंतर लगेचच दूरदर्शनवरून अत्यंत भावपूर्ण आणि मधुर गीत प्रसारित करण्यात आले आणि या गीताने संपूर्ण देशातील लोकांची मने जिंकून घेतली. प्रसिद्ध हिंदुस्थानी शास्त्रीय गायक पंडित भीमसेन जोशी यांनी गायलेले मिले सूर मेरा तुम्हारा या गीताच्या सुरवातीच्या ओळीसाठी हे गाणे आजही सर्वोत्कृष्ट आणि अविस्मरणीय ठेवा आहे. 'एक राष्ट्र, एक राग' या संकल्पनेवर आधारित असलेले सहा मिनिटांचे हे गीत अत्यंत सर्जनशील पद्धतीने वेगवेगळ्या भाषांमधून रचलेले आहे.

या गीतामध्ये कमल हसन, अमिताभ बच्चन, मिथुन चक्रवर्ती, रेवती, जितेंद्र, वहिदा रहमान, हेमामालिनी, तनुजा, शर्मिला टागोर, शबाना आझमी, दीपा साही, ओम पुरी, दीना पाठक आणि मीनाक्षी शेषाद्रीया लोकप्रिय चित्रपट कलाकारांचा सहभाग होता. त्याचबरोबर या गीतामध्ये नृत्यांगना मलिनका साराभाई, व्यंगचित्रकार मारिओ मिरांडा, चित्रपट निर्माती करणारे मृणाल सेन, लेखक सुनील गंगोपाध्याय आणि अवदशंकर र; गायक आणि संगीतकार पंडित भीमसेन जोशी, एम बालमुरलीकृष्ण, लता मंगेशकर, सुचित्रा मित्रा आणि कविता कृष्णमूर्ती; तसेच क्रिकेटपटू खेळाडू नरेंद्र हिरवानी, एस. वेंकटराघवन, अरुण लाल, सय्यद किरमाणी; बॅडमिंटनपटू प्रकाश पदुकोण; टेनिसपटू रामनाथन कृष्णन; फुटबॉलपटू पी. के. बॅनर्जी व चुनी गोस्वामी; हॉकीपटू लेस्ली क्लाडियस व गुरुबक्ष सिंग असा विविध क्षेत्रांतील मातब्बर व्यक्तींचा आणि त्यासंबंधीत अनेक सर्वसामान्य लोकांचाही सहभाग होता. भारतातील भाषिक विविधता या बहुभाषिक गीतामध्ये अत्यंत सर्जनशीलतेने सर्वोत्कृष्ट स्वरूपात सादर केली आहे.या गीताचे बोल पियुष पांडे यांनी हिंदी, आसामी, बंगाली, गुजराती, कन्नड, काश्मिरी, मल्याळम्, मराठी, ऊडिया, पंजाबी, सिंधी, तामिळ, तेलगु आणि उर्दू या 14 भाषांमध्ये लिहिले आहेत.

पत्रलेखा

चित्रकला, मुर्तीकला, शिल्पकला आणि वास्तुकला हे प्राचीन भारतीय संस्कृतीचे अंगभूत महत्वाचे भाग आहेत.बहुतेक पुरातत्व स्थळे आणि पुरातत्व उत्खनन केलेल्या ठिकाणी, त्याचप्रमाणे देशभर दिसणाऱ्या मंदिर स्थापत्यशास्त्रात याचा पुरावा आपल्याला पहायला मिळतो. यापैकी 'पत्रलेखा' सारख्या प्राचीन शिल्पांचा अभ्यास करून ही शिल्पे आपण समजून घेतली पाहिजेत.प्राचीन काळी स्त्रियांचे जीवन सध्या प्रचलित असलेल्या समजुतीच्या अगदी विरुद्ध होते, असे या शिल्पांमधून प्रतित होते. त्याकाळी स्त्रियांना भारतीय समाजजीवन उच्च दर्जा दिला जात होता. त्यांना कोणतेही शिक्षण मोफत घेण्याचा अधिकार होता. ऋग्वेदातील काही स्तोत्रे कवयित्रींनी रचली असल्याचेही आपल्याला आढळते.

पत्रलेखा किंवा सुरसुंदरी शिल्पाची (१०व्ये१२वे शतक, भारतीय संग्रहालय, कोलकाता) प्रतिकृती येथे प्रदर्शित केली आहे.भारतीय समाजातील विद्वान महिलांच्या अस्तित्वाचे हे मूर्तिमंत स्वरूप आहे. विश्ववरा, लोपामुद्रा, अपला, उर्वशी, घोषा, सुलभा, लीलावती, मैत्रेयी, सरस्वती, क्षणा, गार्गी आणि यांसारख्या विद्वान स्त्रियांचे संदर्भ आपल्याला प्राचीन भारतीय इतिहासात मिळतात. प्राचीन भारतातील विद्वान तपस्वी, ऋषी याज्ञवल्क्यांची पत्नी मैत्रेयी ही आपल्या पतीबरोबर तत्वज्ञानाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करायची. घोषाने ऋग्वेदातील दशाव्या भागात असलेली दोन संपूर्ण स्तोत्रे रचली आहेत. याप्रत्येक स्तोतात १४ श्लोकांचा समावेश आहे. गार्गी या ऋषी वाचकणू यांच्या कन्येने वेदांमध्ये अनेक स्तोत्रांची रचना केली असून त्यामध्ये सृष्टीतील सर्व घटकांच्या अस्तित्वाच्या उत्पत्तीवर विवेचन केले आहे.

ACKNOWLEDGEMENT

We sincerely acknowledge the support from the following institutions and persons for providing the necessary documents and extending their help for the exhibition

All India Radio
Anthropological Survey of India, Kolkata
Archaeological Sciences Centre, IIT Gandhinagar
Asiatic Society, Mumbai
Bangiya Bijnan Parishad, Kolkata
Bhandarkar Oriental Research Institute, Pune
Bharatiya Jnanpith, Delhi
Bhasha Research and Publication Centre, Vadodara
Bose Institute, Kolkata
Central Institute for Buddhist Studies, Leh
Central Institute of Indian Languages, Mysore
Centre for Linguistic Science and Technology, IIT Guwahati
Dept. of Linguistics, Deccan College, Pune
Film Division, Mumbai
Gandhi Ashram, Ahmedabad
Godrej Archives
Indian Museum, Kolkata
Indira Gandhi Rashtriya Manav Sangrahalaya, Bhopal
Little Lamp Films, Mumbai
Ms Jaya Jaitly Ji, renowned handicraft curator
National Archives, USA
National Gallery of Modern Art, New Delhi
National Mission for Manuscripts, Delhi
National Museum, Delhi
Nehru Memorial Museum & Library (NMML), Delhi
Prof. Anvita Abby, former JNU professor and renowned linguistic, Delhi
Prof. G. N. Devy, Indian literary critic
Prof. Rajnish Kumar Mishra, JNU, New Delhi
S. N. Bose National Centre for Basic Sciences, Kolkata
Sahitya Akademi, Delhi
Science Museum, London
Sringeri Math, Sringeri, Chickmagalur District
University of Chicago's Digital South Asia Library
University of Mumbai
Visva-Bharati University, Shantiniketan
Bakle Brothers- Renuka Offset Printers, Hubli, Karnataka

Research Design & Developed by

Ministry of Culture
Government of India

Nehru Science Centre
National Council of Science Museums,
Ministry of Culture Government of India